**<u>ग्रामपंचायत लेखा परिक्षणाची सुधारित कार्यपध्दती.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**
**परिपत्रक क्रमांक-लेखाप-२००७/प्र.क्र.७१२/वित्त-४**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक :- २४ सप्टेंबर, २००८**

**<u>वाचा</u>** :- शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.संकीर्ण-१००८/प्र.क्र.३४/कोशा-५, दि.७ जुलै,२००८.

**<u>प्रस्तावना</u>** :-

राज्यातील ग्राम पंचायत लेखापरिक्षणाचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, मोठया प्रमाणावर ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण थकीत आहेत. काही बाबतीत तर दहा वर्षे वा त्याहूनही अधिक काळासाठी लेखापरीक्षण थकीत आहे. जुन्या कालावधीचे लेखापरीक्षण मुख्यत्वेकरुन अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध न केल्यामुळे थकीत आहे. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ५७ नुसार ग्रामपंचायतीच्या ग्राम निधीचे लेखा परिक्षण करण्याचे अधिकार कलम ३ (अ-३) नुसार मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा यांना आहेत. याबाबत मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचेकडून माहिती घेतली असता असे दिसून येते की, लेखापरीक्षण अद्ययावत करण्यासाठी दोन महत्वाच्या अडचणी आहेत. त्यामध्ये एक कारण अपुरे मनुष्यबळ व दुसरे कारण लेखापरीक्षणासाठी आवश्यक अभिलेखे वेळीच उपलब्ध न करुन देणे हे होय. लेखापरीक्षकास सहकार्य करणे याबाबतही कमतरता अनुभवास येते. ग्रामपंचायत लेखापरीक्षणातील या थकीत प्रकरणांचा निपटारा लवकरात लवकर करण्याची निकड विचारात घेऊन याबाबत तातडीने उपाययोजना करण्याचे शासनाने ठरविले आहे. राज्यातील ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण प्रलंबीत राहू नये व हे लेखापरीक्षण अद्ययावत करण्याच्या दृष्टीने सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

परिपत्रक
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा-
आवक नं.-
14 OCT 2008

१) ग्रामपंचायत लेखापरीक्षणासाठी अपुरे मनुष्यबळ विचारात घेता सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सुचना देण्यात येत आहेत की, त्यांनी ग्रामपंचायतींच्या लेखापरीक्षणाचा अनुभव असलेले विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) या पदावरील किमान दोन कर्मचाऱ्यांच्या सेवा या

आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसात प्रत्येक जिल्हयातील संबंधित उप मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांचेकडे ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षणाच्या कामासाठी वर्ग कराव्यात. ही व्यवस्था ग्रामपंचायत थकित लेखापरीक्षण अद्ययावत होईपर्यंत राहील. जिल्हा परिषदांकडील कर्मचा-यांच्या सेवा सद्यःस्थितीत १ वर्षापर्यन्त राहिल. १ ऑक्टोबर २००८ किंवा प्रत्यक्ष कर्मचारी हजर झाल्यापासून यापैकी अगोदर घडेल त्या तारखेपासून सेवा वर्ग झाल्या असे समजावे. त्यापुढे कामाची प्रगती व गरज पाहून मुदतवाढ देण्याचा विचार करता येईल. जिल्हा परिषदेकडील उपरोक्त कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते इत्यादी बाबी जिल्हा परिषद कार्यालयाने हाताळाव्यात. त्यासाठी आवश्यक ते उपस्थिती व रजा अहवाल उप मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांनी जिल्हा परिषदेकडे दरमहा द्यावेत व याबाबतची व्यवस्था स्थानिक स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लेखापरीक्षण दौरा कार्यक्रम विचारात घेऊन निश्चित करावी.

२) ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण अहवाल स्थानिक निधी लेखा विभागातील लेखापरीक्षकानी स्वाक्षरी करुन अहवाल निर्गमित करणे आवश्यक आहे. त्यामुळे त्या लेखापरीक्षकांसोबत जिल्हा परिषदेकडील कर्मचाऱ्यांना ग्रामपंचायत लेखापरीक्षणासाठी काम करणे आवश्यक राहील. सदरचे कर्मचारी हे ग्रामपंचायत लेखापरीक्षण थकीत कामाच्या निपटाऱ्यासाठी स्थानिक निधी लेखापरीक्षणाचे कामी लेखापरीक्षकांना मदत करतील.

३) ग्रामपंचायत लेखापरीक्षणाच्या कामकाजाबाबत संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये असे निर्देश देण्यात आले आहेत की, प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी यापुढे सर्व योजनासहीत एकच लेखापरीक्षण अहवाल निर्गमित करण्यात येईल. ग्रामपंचायत लेखापरीक्षण नियमामधील तरतुदीनुसार रु.२५,०००/- च्या वर उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखा विभागाने करावयाचे आहे. त्यामुळे वरीलप्रमाणे ग्रामनिधीसह सर्व योजनांची एकत्रित सर्व जमा विचारात घेऊनच ही रु.२५,०००/- ची मर्यादा लागू होईल. सर्व योजनांसह (केंद्र, राज्य व ग्रामनिधी इत्यादी) येणारे उत्पन्न रु.२५,०००/- गृहीत धरुन लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखा विभागाने करावयाचे असल्याने विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) यांचे स्वतंत्र लेखापरीक्षण करण्याचे काम कमी होणार आहे. या निर्णयामुळे जवळजवळ सर्वच ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखा विभागाने करावयाचे आहे.

४) ग्रामपंचायत लेखापरीक्षणासाठी आवश्यक अभिलेख कोणतीही अडचण उपस्थित न करता लेखापरीक्षकांना उपलब्ध करुन देणेबाबत सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्वरीत कार्यवाही करावी. संबंधितांना सूचना देण्यात याव्यात. यासाठी दरमहा गट विकास अधिकारी घेत असलेल्या ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी यांच्या मासिक आढावा बैठकीत अनिवार्यपणे ही बाब सर्व ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावी. लेखापरीक्षणास सर्व कालावधीचे सर्व योजनासह ग्रामनिधीचे संपूर्ण अभिलेख उपलब्ध करण्याच्या सूचना देऊन तसे करण्यास कोणतीही अडचण राहणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच प्रत्येक मासिक बैठकीत मागील महिन्यात झालेल्या लेखापरीक्षणामध्ये लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याचे निदर्शनास आल्यास गट विकास अधिकारी यांनी तातडीने संबंधित ग्राम सेवका विरुध्द कारवाई प्रस्तावित करुन तसा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पाठवावा. असे अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरमहा १० तारखेपर्यंत मागवून त्याआधारे संबंधितांविरुध्द कायदेशीर कडक कारवाई करावी.

५) लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध केले नाहीत अशा आशयाचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना मुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी लेखा यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर त्यावर तात्काळ कार्यवाही करावी व सदरचे अभिलेख पुढील महिन्यात उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी तसेच दोषी कर्मचारी / अधिकारी यांचेविरुध्द कारवाई करावी. त्यांचे स्वतंत्र अभिलेख ठेवावे.

६) लेखापरीक्षणामध्ये उपस्थित केलेल्या गैरव्यवहार व अफरातफर प्रकरणी ग्रामपंचायत निहाय स्वतंत्र अभिलेख तयार करुन संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वसुलीची कार्यवाही तात्काळ अमलात आणावी व त्याचा त्रैमासिक अहवाल विभागीय आयुक्तांना पाठवावा. त्याची एक प्रत शासनास (वित्त-४ कार्यासनाकडे) पाठवावी. त्या अहवालासोबत ग्रामपंचायतीचे वर्षनिहाय आक्षेप, त्यापैकी तिमाहीत निपटारा झालेले व प्रलंबित

आक्षेप किती याचीही माहिती खालील प्रपत्रात द्यावी.

**प्रपत्र "अ"**

**ग्रामपंचायतींचे प्रलंबित आक्षेप**

| एकूण ग्राम पंचायतीची संख्या | लेखा परिक्षण झालेल्या ग्राम पंचायतींची संख्या | आरंभीचे शिल्लक आक्षेप | चालू तिमाहीत घेतलेले आक्षेप | एकूण आक्षेप | चालू तिमाहीसह निपटारा | एकूण टक्के | शिल्लक आक्षेप | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

**प्रपत्र "ब"**

**लेखापरिक्षणासाठी उपलब्ध न झालेल्या अभिलेखाबाबतची कार्यवाही**

| एकूण ग्राम पंचायत | अभिलेख उपलब्ध न केलेले लेखा वर्ष | जबाबदार पदाधिकारी व अधिकारी / कर्मचारी यांची नांवे | केलेली कार्यवाही | कार्यवाहीचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

**पत्र "क"**

**अफरातफर / गैरव्यवहार प्रकरणे**

| ग्राम पंचायतींची संख्या | एकूण प्रकरणे | गुंतलेली रक्कम | वसूल रक्कम | शिल्लक | गुंतलेले कर्मचारी / अधिकारी / पदाधिकारी यांची नावे | केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

७) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उप मुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी यांचेकडे ग्रामपंचायतीच्या लेखापरीक्षणाचा अनुभव असल्याच्या ज्या दोन कर्मचाऱ्यांच्या सेवा वर्ग केल्या आहेत त्याची नांवे व पदनाम याची माहिती शासनास दि. १० ऑक्टोबर, २००८ पर्यंत पाठवावी.

जिल्हयातील थकीत लेखापरीक्षण लवकरात लवकर पूर्ण व्हावे व गैरव्यवहाराची प्रकरणे घडू नयेत तसेच ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवाल अद्ययावत व्हावा या हेतूने शासनाने वरील निर्णय घेतला आहे. सर्व संबंधितांनी या निर्णयाची काटेकोरपणे

अंमलबजावणी करण्याची दक्षता घ्यावी. यथोचित कार्यवाही न करणाऱ्या अथवा अंमलबजावणीसाठी विलंब करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द आवश्यक ती शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याचीही सर्वांनी नोंद घ्यावी.

८. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक -**200809241228510001** आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( मा. गो. भोंगाडे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
प्रधान सचिव, वित्त विभाग.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र, नागपूर.
प्रधान महालेखापाल (लेखापरिक्षा) - १, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखापरिक्षा) - २, महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल, वाणिज्यिक लेखा परिक्षा, महाराष्ट्र, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई (पत्राने).
प्रबंधक लोकायुक्त कार्यालय, नविन प्रशासकीय भवन, मुंबई (पत्राने).
सर्व विभागीय आयुक्त.
मुख्य अभियंता, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
सर्व जिल्हाधिकारी.
संचालक (लेखा व कोषागारे), मुंबई.
मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद.
सर्व उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा.
सर्व उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, जिल्हा परिषद.
सर्व कोषागार अधिकारी.
सर्व अवर सचिव / कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
अवर सचिव, कोषा प्र-५, / अर्थ-१७ / वित्त आयोग कक्ष, वित्त विभाग, मंत्रालय.
निवड नस्ती, कार्यासन क्र.वित्त-४, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

A:/LETTER-16-8-08.lwn